# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२४-२५/१०७०
दिनांक : १२.१२.२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : सन २०२३-२४ या वर्षाचे राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रस्तावाबाबत.**

महोदय/महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना रौप्य महोत्सवी वर्षापासून महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांचेकडून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबदल विद्यापीठ, कार्यक्रम समन्वयक, महाविद्यालय (एकक) कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना दरवर्षी राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतात. त्यानुसार २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापर्यंत व मागील ३ वर्षांमध्ये ज्या विद्यापीठ/ कार्यक्रम समन्वयक/महाविद्यालय/कार्यक्रम अधिकारी/स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव सन २०२२-२३ च्या मार्गदर्शक नमुन्यात मागविण्यात येत आहेत. (सन २०२३-२४ साठी चे पत्र अद्याप केंद्र व राज्य शासनाकडून अप्राप्त असल्याने सन २०२२-२३ च्या मार्गदर्शक सुचना नुसार सन २०२३-२४ साठीचे प्रस्ताव मागविण्यात येत आहे.)

महाविद्यालय स्तरांवर स्वयंसेवक (पुरूष/महिला) यांचे पुरस्कारासाठीचे प्रस्ताव मागविण्यात यावेत व त्यांची छाननी करून उत्कृष्ट प्रस्ताव विद्यापीठ रासेयो विभागास सादर करावेत तसेच कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालय एकक यांचे प्रस्ताव तयार करून विद्यापीठ रासेयो विभागास **दिनांक ०४.०१.२०२५ तत्पूर्वी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे पाठविण्यात यावेत**.

सदर प्राप्त प्रस्तावामधून जिल्हा/विद्यापीठ स्तरांवर उत्कृष्ट स्वंयसेवक/कार्यक्रम अधिकारी/ रासेयो एकक यांचे प्रस्ताव छाननी करून निवडण्यात येतील.

जिल्हा/विभाग स्तरांवरील छाननी करून प्राप्त प्रस्तावामधून विद्यापीठ स्तरीय उत्कृष्ट स्वंयसेवक/कार्यक्रम अधिकारी/महाविद्यालय रासेयो एकक यांचे प्रस्ताव छाननी करून निवडण्यात येतील.

सदर विद्यापीठ स्तरीय प्राप्त प्रस्तावामधून उत्कृष्ट स्वंयसेवक/कार्यक्रम अधिकारी/ महाविद्यालयीन रासेयो एकक यांचे प्रस्तावांची राज्य स्तरीय पुरस्कारासाठी शिफारस करण्यात येतील.

छाननी करून जिल्हा/विभाग स्तरीय निवडलेल्या प्रस्तावामधून उत्कृष्ट स्वंयसेवक/कार्यक्रम अधिकारी/महाविद्यालय रासेयो एकक यांचे मराठी व इंग्रजी प्रस्तावाची प्रत (Hard Copy) **दिनांक ०४.०१.२०२५ तत्पूर्वी** विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागास सादर करणे आवश्यक आहे.

**रासेयो पुरस्काराचे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात सादर करणे बंधनकारक आहे. त्या संदर्भातील प्रस्ताव पाठविण्याची लिंक (युझर आयडी, पासवर्ड) व वेळापत्रक राज्य शासनाकडून प्राप्त झाल्यावर आपणांस कळविण्यात येईल यांची नोंद घ्यावी.**

केंद्र शासनाकडून सन २०२२-२३ या सत्रासाठी प्राप्त मार्गदर्शक तत्वे, सूचना व नमुना अर्ज या पत्रासोबत जोडत आहे. त्याप्रमाणे सन २०२३-२४ या सत्रासाठी रासेयो स्वंयसेवक/कार्यक्रम अधिकारी/महाविद्यालयीन रासेयो एकक यांचे प्रस्ताव तयार करण्यात यावेत.

मुंबई विद्यापीठ अंतर्गत विद्यापीठस्तरीय पुरस्कारामध्ये उत्कृष्ट विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयक यांना देखील पुरस्कार दिला जातो. त्यासंदर्भात सन २०२३-२४ या वर्षासाठीच्या पुरस्कारासाठी संबंधीत विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयक यांनी त्यांचे प्रस्ताव हार्ड कॉपी मध्ये **दिनांक ०४.०१.२०२५ तत्पूर्वी** विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षास सादर करावेत. ही विनंती.

**आपला**

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**सोबत :** सन २०२२-२३ साठी केंद्र शासनाकडून प्राप्त पुरस्कार प्रस्ताव मागविण्यासाठीचे परिपत्रक.